Impact Factor – 6.261 Special Issue - 109 Feb. 2019 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

Two Days Interdisciplinary International Conference on


# Role of Social Reformers in Nation Building

Pankaj Shaikshanik and Samajik Sanstha's

**Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda**

( 'B' Grade NAAC Accredited )

**K.B.C. North Maharashtra University,**
Jalgaon



- EDITOR -

**Prin. Dr. Sambhaji N. Desai**

- CHIEF EDITOR -

**Mr. Dhanraj T. Dhangar**

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist.Parbhani

ISSN : 2348-7143
February 2019
RESEARCH JOURNEY Internationl Multidisciplinary E-Research Journal
*Impact Factor (SJIF) - 6.261* | *Special Issue 109 :* Role of Social Reformers in Nation Building

# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवादी जाणिवा एक शोध

– डॉ. राजीव य
मराठी वि
गुरूबुद्धी स्वामी महाविद्यालय,

**प्रास्ताविक :**

अण्णा भाऊ साठे यांचे नाव आज साहित्य वर्तुळात मोठ्या दिमाखाने घेतले जाते. पण एक काळ असा होता की अण्णा भाऊ यांचे नाव घेताच पांढरपेशी समाजातील माणसांचया नकळत भुवया उंचवायच्या, त्यांना शिसारी येत. कारण ते मातंग समाजात जन्मल्या त्यांचे आंबेडकरी साहित्य बराच काळ सामान्य वाचकापर्यंत पोहचण्यास वेळ लागला. अर्ध्या हळकुंडाने पिवळं झालेल्या समिक्षकांनी साहित्य नाकारले. पण वाचकांनी त्यांना आणि त्यांच्या साहित्याला वाचले नव्हे तर मनाच्या गाभाऱ्यात बंदिस्त केले. केवळ त्यांच्या असणाऱ्या मानवीमूल्यांमुळे, समता, स्वातंत्र्य, बंधुतावादी मूल्यांमुळेच आज त्यांचे साहित्य वाचक प्रिय झाले.

लोकलेखक अण्णा भाऊ साठी यांचे साहित्य हे केवळ मराठी वाङ्मय विश्वाचा भाग नाही तर ते संस्कृतीच्या संचिताचा अभिन्न बनले आहे. लेखकाला समाजाबद्दल मूलभूत आस्था असायला पाहिजे, लेखकाचे समाजावर प्रेम असायला हवे तरच या सामाजीतल विस त्याला व्यथित करतात. विसंगती शोषण, दु:ख दूर करण्याच्या विचाराने तो प्रेरित होतो. समाज बदलला पाहिजे. या भावना त्यांच्या म उत्पन्न होतात. अण्णा भाऊ साठे यांच्यातील लेखक असाच आकाराला आला.

अण्णा भाऊच्या लेखनाची सुरूवात १९४२ सालापासून झाली. खरे पाहता मराठी सारस्वतांना जी पात्र वाचताना अंगावर शिसारी येत असत अशी पात्रे आपल्या साहित्यातून उभी करत. साहित्य जगताला वास्तवाची जाणीव करून देण्याचे काम त्यांनी केले. 'भारीचा संघर्ष आमच्या पाचवीलाच पुजला आहे; परंतु त्यासाठी मानवी मूल्यांचा बळी देणार नाही.' अशी ठाम भूमिका अण्णा भाऊंनी घेतली. त्यांच्या साहित्याला वास्तवाचा स्पर्श आहे. साहित्याच्या वास्तवसंदर्भात अण्णा भाऊ साठे म्हणतात, मी जे जीवन जगले, अनुभवले तेच मी लिहिले, मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही, त्या बाबतीत मी स्वत:ला बेडूक समजतो. अशी वास्तवदर्शी भूमिका मांडणारा लेखकच आंबेडकरवादी असू शकतो. १९५६ साली अण्णा भाऊंनी 'फकिरा' कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखनीस नम्रपणे अर्पण केली. त्यांनी आंबेडकरी वैचारिकतेचा मागोवा घेतला. बाबासाहेब दीन-दलितांना काय सांगून गेले तसेच आपला आंबेडकरी बाणा काव्यरूपाने व्यक्त करताना ते म्हणतात –

*'जग बदल घालून घाव।*
*सांगून गेले मज भीमराव।।*
*करी प्रगट निजनाव।*
*सांगूनी गेले मज भीमराव।।'*

अण्णा भाऊ साठे अष्टपैलू लेखक होते. त्यांनी 'बरबाद्या कंजारी', 'निखारा', 'नवती', 'आबी', 'फरारी', 'भानामती', 'लाडी', 'कृष्णाकाठच्या कथा', 'खुळंवाडी', 'गजाआड', 'गुऱ्हाळ' इत्यादी बारा कथा संग्रह तसेच 'फकीरा', 'आग', 'आघात', 'अहंकार', 'कुरूप', 'चिमा', 'वारणेच्या खोऱ्यात', 'संघर्ष', 'चंदन', 'मूर्ती', 'मास्तर', 'वैर', 'चिखलातील कमळ', 'माकडीचा माळ', 'वैजयंता', 'वारणेचा वाघ' इत्यादी तिर्कत कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. या शिवाय तीन नाटके, एक शाहीर, चौदा लोकनाट्य, दहा पोवाडे आणि एक प्रवास वर्णन इत्यादी अक्षर वाङ्मय त्यांनी लिहून आंबेडकरी विचार जनमानसात पोहचविले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या झंझावती वादळाने सारा द समाज जागा केला, त्यांना आत्मभान आणून दिले, माणूस म जगण्यास शिकविले, अन्यायाच्या गर्तेत खितपत पडलेल्या समाज अंधारातून बाहेर काढून नव्या क्रांतीच्या उजेडात आणले. अ भाडफ साठेंच्या साहित्यावर आंबेडकर विचारांचे संस्कार झा आहेत. आंबेडकरवाद हा प्रत्येक माणसाला जगण्याची नवी संजि देणारा विचार आहे. हजारो वर्ष वर्ण-व्यवस्थेच्या जात्याखाली खि पडलेल्या समाजाला जागे करणारा ओलावा म्हणजे आंबेडकरवा याच आंबेडकरवादाचा अण्णा भाऊ साठे यांनी स्वीकार केला. म त्यांना आंबेडकरांचे विचार जगण्याची शिदोरी वाटू लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्ष वारसा त्यांच्या अ कथेतून प्रकटताना आपल्याला दिसतात. १९५६ नंतर 'स्मशना सोनं', 'थडग्यातील हाडं', 'निळू मांग', 'सावळा मांग' इत परिवर्तनवादी कथा अण्णा भाऊंनी लिहिल्या. अन्यायाचा प्रति करणारे, परंपरेविरूद्ध बंड पुकारणारे, स्वाभिमानी पात्र अ भाऊंनी निर्माण केले. या पत्रातून ते डॉ. बाबासाहेब आंबेडक कार्य प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न करीत होते. डॉ. बाबास आंबेडकरांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याला साहित्यिक अ सांस्कृतिक अनुकूलता निर्माण करून देण्याचे महान ऐतिहासिक अण्णा भाऊ साठे यांनी केले. हे काणीच नाकारू शकणार नाही.

वास्तवाला सार्थपणे भिडणे हे अण्णा भाऊ यांच्या क निराळेपण आहे. भोवतालच्या घडामोडींचा वेध घेत त्यावर आप कलाकृतीमधून भाष्य त्यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडक जेव्हा मेलेली भेदक चित्रण 'सापळा' या कथेत अण्णा भाऊ यांनी केले. सापळा ही केवळ दलित-सवर्णाच्या संघर्षाची कथा तर ती पूर्वास्पृश्यांमध्ये नव्याने विकसित झालेल्या आत्मसन्मान कथा आहे. यासारख्या त्यांचया अनक कथांचा विचार करता ये तसेच त्यांनी 'वळण' नावाची कथा देखील आंबेडकरी विचार प्रवा सामावणारी वाटते. अण्णा भाऊ साठे यांच्या 'फकिरा' कादंबरी

Co-ordinator IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna Dist. Parbhani - 431511 (M.S.)
Estd.1983
PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya

ायक जेव्हा बेडसगावाचा खजिना लुटण्याकरीता जातो तेव्हा ब्राह्मणाकडे बंदूक असल्याचं सांगतो. त्यामुळे फकिराचं ळतं आणि तो त्वेषानं म्हणतो... 'आरं माझं बाळ तोफ बेकार होणार न्हाय..! बंदूक..? असू दे बंदूक..! किती उडवीती..? एकेक माणूस धा धा गोळ्या खाऊया..! उद्या ते आ मरुया. पन जरा माणसावानी नि हिंमतीने..! आरं, शान शंभर वर्ष जगण्यापेक्षा वाघ हूनशानं एक दिस जगू.' ाऊ साठे यांनी फकिरामध्ये सांगितलेले तत्वज्ञान व फकिराने विचार आंबेडकरी आहेत. अण्णा भाऊ साठे हे परिवर्तनवादी क होते. त्यांच्या अनेक साहित्य कृतीतून बाणेदार, तडफदार नायिका डोकावतात. जणू काही त्यांच्या तोंडून साठे यांनी रवाद बोलून दाखविला. त्यांच्या नायक, नायिका जगण्यासाठी , नव्या जीवनाची वाट पाहतात. जगण्यातून लढण्यासाठी बळ ात. कधी थकतात तर कधी नव्या उद्याच्या उमेदीने उठतात. ांतीची भाषा बोलू लागतात. म्हणून अण्णा भाऊ साठे यांनी मार्मिकपणे आपल्या साहित्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वादी जगण्याची उमेद देणारे विचार मांडले.

बराच काळ दुर्लक्षित राहिलेली पण आता प्रकाशित झोलेली भाऊ साठे यांची 'बुद्धाची शपथ' ही कथा आंबेडकरी विचार ना दिसते. 'सापळा' ही कथा जशी जुन्या मूल्य परंपरांना नाकार कथा आहे तशीच नव्या जीवन प्रणालीचा स्वीकाराची कथा अण्णा भाऊ साठे यांच्या 'बुद्धाची शपथ' या वैशिष्ट्यपूर्ण उल्लेख करावा लागेल. धम्म स्वीकाल्यानंतर नव्या जाणिवा द्धतीने समूह मनाची पकड घेऊ पाहत होत्या. लहान मुलांचे कोवळी मने नव्या मूल्यांनी कशी भरल्या गेली याचे जिवंत, र्णी चित्रण अण्णा भाऊ साठे करतात. 'बुद्धाची शपथ' ही लक्षण कथा आहे. धम्म स्वीकारानंतरच्या सामाजिक उलथा वर इतकं सकारात्मक भाष्य अण्णा भाऊ साठे यांचया कथेत ते. म्हणून या लघू शोध निबंधात साठे यांच्या साहित्यातील कर जाणीव शोधावयाचे प्रयत्न केले आहेत.

**उद्दिष्ट्ये :**

१. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी जाणिवांचा वेध घेणे.
२. समकालीन साहित्याच्या तुलनेत अण्णा भाऊ साठे यांचया साहित्याचे वेगळेपण समजावून सांगणे.
३. अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र साहित्यातून येणारी आंबेडकरी जाणीव तपासणे.
४. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवी मूल्यांचा शोध घेणे.
५. अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यातील संघर्षशील, लढाऊ वृत्तीचे, स्वाभिमानी नायक व नायिका शोधणे.
६. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यात आंबेडकरवाद कसा आला आहे ते शोधणे.
७. समकालीन साहित्यातील आंबेडकरवाद आणि अण्णा भाऊ साठे यांचया साहित्यातील आंबेडकरवाद यांचा परस्पर संबंध शोधणे.
८. इतर आंबेडकरी साहित्ये आणि अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवाद यातील प्रखर वास्तवतेचा शोध घेणे.
९. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यावर आधारित आंबेडकरी जाणीव शोधणे.
१०. 'भूक' आणि 'माणूस' केंद्र समजणारे अण्णा भाऊ साठे यांचे आंबेडकरी साहित्याचा आढावा घेणे.
११. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरी चिंतनशीलता शोधणे.
१२. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील परिवर्तन आणि क्रांतीकारी विचार स्पष्ट करणे.
१३. मराठी साहित्य आणि दलित साहित्यातील अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे स्थान काय? याचा शोध घेणे.

**निष्कर्ष :**

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातून व्यक्त झालेला आंबेडकर जाणिवांचा शोध घेणे. समकालीन साहित्याच्या तुलनेत साठेंच्या साहित्याच्या वेगळेपणाचा अभ्यास करणे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील मानवीमूल्य जाणिवांचा अभ्यास करणे. अण्णा भाऊ साठे यांच्या समग्र साहित्यातून येणारी आंबेडकरी जाणीव स्पष्ट करणे. अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यातील संघर्षशील, स्वाभिमानी, लढाऊ वृत्तीच्या नायकांचा अभ्यास करणे. भूक आणि माणूस केंद्र जपणारे अण्णा भाऊ साठे यांच्या आंबेडकरी धार असणाऱ्या साहित्याचा अभ्यास करणे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता यावर आधारीत असणाऱ्या आंबेडकरी जाणिवांचा अभ्यास करणे हा या लघु निबंध लेखनाचा मुख्य उद्देश आहे.

**संदर्भ**

१. कऱ्हाळे सदा, 'अण्णा भाऊचे कथाविश्व', प्रगत साहित्य सभा, मुंबई - १९७०
२. कुंभार नागोराव (संपा.), 'शाहीर अण्णा भाऊ साठे', प्रबोधन प्रकाशन, लातूर - १९९३
३. कठाळे नानासाहेब, 'अण्णा भाऊ साठे : जीवन आणि साहित्य', समता प्रकाशन - १९९६
४. गायकवाड आसाराम (संपा.), 'लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णा भाऊ साठे', झेप प्रकाशन, नाशिक ज़् १९९६
५. गुरव बाबूराव, 'अण्णा भाऊ साठे साहित्य आणि समीक्षा', निर्मल प्रकाशन, नांदेड - २०११

Co-ordinator
IQAC
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist. Parbhani - 431511 (M.S.)

Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya Purna Estd.1983

PRINCIPAL
Shri Guru Buddhiswami Mahavidyalaya
Purna (Jn.) Dist Parbhani